# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director(I/c.)
Mo. No. - 8888282463

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 800 /2019 Dt: 26/07/2019

प्रति,

मा. प्राचार्य / रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषय:**—रासेयो महाविद्यालयामध्ये १२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या एचआयव्ही / एडस विषयी युंवकामध्ये जनजागृती उपक्रम (१२ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट) राबविण्याबाबत.....

**संदर्भ:**— १) मा. उपसंचालक (आईसी)मराएनिस यांचे पत्र क्र. मराएनिस / आईसी / आयुदिन / २०१९–२० / १३८३–१४१८ दिनांक १७ / ०७ / २०१९

२) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली. यांचे पत्र क्र जा. क्र / सा. रु.ग / डाप्कु / आयुदिन / २०१९ / ५०५५ दिनांक २६ जुलै २०१९

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघठन,(नॅको) नवी दिल्ली अन्वये आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमीत्य आपल्या महाविद्यालयामध्ये एचआयव्ही / एड्सविषयी जनजागृती उपक्रम आयोजीत करण्यात यावे.

दिनांक १२ ऑगस्ट हा आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणुन जगभर उत्साहाने साजरा केला जातो. या वर्षी युनायटेड संघटनेचे युवा दिनाविषयीचे 'Transforming Education' हे घोषवाक्य आहे. या दिवशी युवक–युवतीच्या क्षेत्राशी / विषयाशी निगडीत कार्यक्रम आयोजीत केले जातात. या दिनाचे औचित्य साधुन व एचआयव्ही / एड्सविषयी युवकामध्ये जनजागृती करण्याचे दृष्टिने या दिवशी व १२ ते २६ ऑगष्ट या पंधरवाडयात महाविद्यालयामध्ये प्रभातफेरी, शपथग्रहन, रक्तदान शिबीरव्दारे महाविद्यालयात एचआयव्ही / एड्स विषयी व्यापक व प्रभावी जनजागृती करणे इ. उपक्रम राबविण्यात यावे. आंतराष्ट्रीय युवा दिन १२ ऑगष्ट हा फक्त एक दिवस साजरा न करता त्यापेक्षा अधिक दिवसामध्ये महाविद्यालयातील तसेच महाविद्यालयातील बाहय युवक युवतीमध्ये ऐच्छिक तपासणीचे महत्व आणि राष्ट्रीय एड्स हेल्पलाईन क्रमांक १०९७ विषयी जनजागृती करावयाचे आहे.

महाविद्यालयात रॅली, रेड रिबन आकाराची मानवी साखळी, रक्त दान शिबिराचे आयोजन इत्यादी विषयी व्यापक व प्रभावी जनजागृती होईल, यामुळे एचआयव्ही / एड्स मुक्त भारत हा ध्यास ठेवुन नविन पिढीला निरोगी भारत स्वस्थ भारत करण्यास योगदान दयावे, ही विनंती.

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली